आ.तो. ३१।१०।९१
आ क्र. 58/91-92

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे: ४११०१०

क्रमांक पुविमं/शाखा डीपी/मान्यता
पुणे: ४११०१०
दिनांक: -३१-१०-९१-

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
--न्यू इंग्लिश स्कूल निमगिरी
--ता० जुन्नर जि० पुणे

विषय: माध्यमिक शाळेस मान्यता व सांकेतिक क्रमांक देण्याबाबत.

महोदय/महोदया,

मंडळ नियमावली नियम क्रमांक २८(१) अन्वये आपण या मंडळाची प्रथम मान्यता मिळविण्यासाठी केलेल्या अर्जाच्या संदर्भात आपणास कळविण्यात येते की, मार्च १९९२ मध्ये होणा-या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस विद्यार्थी पाठविण्याकरीता आपल्या माध्यमिक शाळेस शिक्षण खात्याने घातलेल्या अटी व त्याशिवाय खालील अटींवर --११.४२८-- हा तात्पुरता सांकेतिक क्रमांक --------मराठी--------या माध्यमासाठी सन १९९१-९२ साठी देण्यात येत आहे. यापुढे या कार्यालयाशी पत्रव्यवहार करताना माध्यमिक शाळेचा वरील निर्धारित सांकेतिक क्रमांक असणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

१) माध्यमिक शाळा संहितेमधील नियम ३, २(६, ७, ८) च्या तरतुदीनुसार सर्व अटीपूर्ण केलेल्या असल्या पाहिजेत.

२) प्रमाणानुसार पुरेशी विद्यार्थीसंख्या असणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ विनियम १९७७ च्या नियम क्रमांक २८(७) अन्वये सर्व अटी पूर्ण असल्या पाहिजेत.

३) मंडळाच्या परीक्षेच्यावेळी ज्या केंद्रावर आपल्या शाळेचे विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट होणार असतील, त्या केंद्रावर पुरेसे/स्वखर्चाने फर्निचर पोचविण्याची जबाबदारी आपली राहील. केंद्रावरील बैठक व्यवस्था किंवा फर्निचरसाठी आपले सहकार्य नसल्यास ही मान्यता पूर्वसूचना न देता विनियम २८(११) अन्वये रद्द केली जाईल.

४) मंडळाच्या परीक्षेसाठी ज्या ज्या वेळेस शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सेवेची आवश्यकता असेल, त्या त्या वेळी ती प्राधान्याने दिली पाहिजे. प्रचलित नियमानुसार परीक्षेचे काम हे आवश्यक व सक्तीचे असल्याने आवश्यक सेवकवर्ग उपलब्ध करुन दिला पाहिजे. परीक्षेच्या कामासाठी माध्यमिक शाळा सेवाशर्ती नियम १९८१ च्या २२( i ) परिशिष्ट I-km नुसार

५) मंडळाने वेळोवेळी दिलेल्या विविध सूचना, नियम, परिपत्रके इत्यादिचे काटेकोर पालन होणे आवश्यक आहे. तसेच त्या पुढील काळात मंडळातर्फे ज्या ज्या सूचना दिल्या जातील, त्याचे सातत्याने पालन केले पाहिजे. तसेच ज्या ज्या वेळेस मंडळाला परीक्षा संचालनाच्या कामात आपली मदत लागेल त्या त्यावेळी आपण ती प्राधान्याने दिली पाहिजे.

६) परीक्षा केंद्रासाठी आपल्या शाळेची इमारत ज्यावेळी आवश्यक असेल त्यावेळी ती उपलब्ध करुन देणे आपल्यावर बंधनकारक राहील.

७) प्रत्येक वर्षी विनियम ४७ (१२) प्रमाणे विहित वेळेत रजिस्ट्रेशन फी भरुन मंडळास कळवा अन्यथा ही मान्यता रद्द केली जाईल.

माध्यमिक शाळाप्रमुखांनी नोंदणी शुल्काची रक्कम आपल्या गावातील अगर गावानजीक महाराष्ट्र बँकेच्या शाखेत मंडळाच्या खालील खाते क्रमांकामध्ये भरावी व भरणा केल्याचे या कार्यालयास/संबंधित उपकार्यालयास चलनाच्या प्रतीसह कळवावे.

खाते क्रमांक पुणे-१० (X) नाशिक-२२(XXII)/कोल्हापूर-२६ (XXXVI)

---

नोंदणी शुल्काचे दर:

| | | |
|---|---|---|
| १) ३०० विद्यार्थी संख्येपर्यंत | रुपये ७५/- दरवर्षी |
| २) ३०१ ते ६०० विद्यार्थी संख्येपर्यंत | रुपये १५०/- १० ऑगस्ट |
| ३) ६०० च्या वर विद्यार्थी संख्येस | रुपये ३००/- पूर्वी देय |

दरवर्षी विहीत तारखेच्या आत नोंदणी शुल्काची रक्कम भरल्याशिवाय आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे स्वीकारली जाणार नाहीत व त्याची संपूर्ण जबाबदारी संस्थाप्रमुख या नात्याने आपली राहील याची कृपया नोंद घ्यावी.

पुणे विभागीय मंडळाची नाशिक/कोल्हापूर ही दोन उपकार्यालये असून आपली शाळा ---------------------- या उपकार्यालयाच्या कक्षेत येत असल्याने परीक्षेसंबंधीचा पत्रव्यवहार अथवा समक्ष संपर्क खालील पत्त्यावर साधावा.

| नाशिक | कोल्हापूर |
|---|---|
| सहसचिव<br>महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळाचे<br>नाशिक उपकार्यालय,<br>व्दारा-गुलाब बंगला, नासिक-पुणे रस्ता<br>शिवाजीनगर, नासिक. | विभागीय सचिव~~सचिव~~,<br>महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,<br>कोल्हापूर ~~विभागीय मंडळ,~~<br>कसबा करवीर शिवाजी विद्यापीठाचे मागे<br>राजेंद्रनगर, ~~सागरमाळ,~~<br>कोल्हापूर. |

आपला विश्वासू,

२१.१०-८-८४

विभागीय सचिवांकरिता,
पुणे विभागीय मंडळ, पुणे-१०.

प्रत माहितीस्तव-

१) शिक्षण उपसंचालक, पुणे/~~नाशिक/कोल्हापूर~~. पुणे-१
२) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद--- पुणे-११
३) ...

आ.क्र. 8191-92
दि. 28/11/91

"यशवंतराव चव्हाण भवन"
पुणे जिल्हा परिषद, पुणे.
माध्यमिक शिक्षण विभाग
जा.क्र. जिप/माध्य/८-४/परवानगी/९१-९२
दिनांक 23/11/91

प्रति,
सचिव,
~~इंद्रायणी विद्या विकास मंडळ नारोडी ता-आंबेगाव जि-पुणे.~~

विषय- इ. ९वी च्या वर्गास प्रथम मान्यता

[illegible] पुणे
उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, इ. ८वी च्या वर्गास मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे जा.क्र. माध्य-३/१२४/मान्यता/माध्यमा/पुणे दिनांक 2-11-91 अन्वये मान्यता दिलेली आहे. व माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ५.२ नुसार उपरोक्त शाळेस जून १९९० पासून इ. ९वी च्या वर्गास विना अनुदान तत्वावर खालील अटींच्या पूर्तता करण्याच्या शर्तीवर मान्यता देण्यात येत आहे.

१) स्वतःची स्वतंत्र शाळेची इमारत असावी.
२) शैक्षणिक व क्रीडा साहित्य खरेदी करावे.
३) फर्निचर खरेदी करावे.
४) नियमानुसार शालेय रेकॉर्ड तयार करावे.
५)

शिक्षणाधिकारी (माध्य.)
पुणे जिल्हा परिषद, पुणे. करिता

O. C. signed by
E.O.Z.P. Pune

प्रत,
१. मुख्याध्यापक, ~~न्यू इंग्लिश स्कूल [illegible]~~

ला. ४/११/८९

त्वरित:

जा.क्र.माध्य-३/१८/नमाशा/मान्यता/पु:
शिक्षण उपसंचालक, पुणे यांचे कार्यालय,
दि.

2 NOV 1989

प्रति,
मा. सचिव,
सह्याद्री विद्या विकास मंडळ,
नारोडी. ता. आंबेगाव जि. पुणे

विषय :- सन. १९८९-९०च्या शै. वर्षात नविन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :- शासनाचे पत्र क्रं. एसएसएन/१०८९/२०२०/माशि-१ दि. २९.९

महाशय,

शासनाचे संदर्भाधिन पत्रान्वये खाली नमूद केलेल्या आपल्या शाळेत मराठी / ~~इंग्रजी~~ माध्यमातून जून १९८९ पासून विना अनुदान / ~~कायम विना अनुदान~~ तत्वावर विशेष बाब म्हणून नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

| अ.नं. | शाळेचे नांव व ठिकाण | माध्यम | इयत्ता | शेरा |
| --- | --- | --- | --- | --- |
| १. | निमगिरी ता. जुन्नर | मराठी | ८ वी | विना अनुदान त |

सदर संस्थांना अनुदान संहितेच्या नियमानुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबीची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पुर्तता करण्याच्या शर्तीवर नवीन शाळा सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे.

अ] या नविन माध्यमिक शाळांना [इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त] शासन निर्णय क्रं. एसएसएन/१०८८/१६६९ /एन-माशि-१ दि. १०.२.८९ अन्वये विहीत केलेल्या नवीन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

२...